# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा - २०१५

**क्रमांक : एमसीपी-०११५/सीआर ३/२०१५/तीन** **जाहिरात क्रमांक : १२८/२०१५**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातील खालील पदावरील भरतीकरीता आयोगामार्फत **महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०१५, रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर,२०१५ रोजी मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल**.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(अ) सार्वजनिक बांधकाम विभाग** | | | | | | | | | | | |
| **(१) सहायक अभियंता, गट-अ, श्रेणी-१ (एकूण पदे-२१)** | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **एकूण मागासवर्गीय** | **खुला** | **एकूण पदे** |
| **पदसंख्या** | ४ | -- | -- | -- | -- | -- | ७ | -- | ११ | १० | २१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | ३ | -- | -- | -- | -- | -- | ५ | -- | ८ | ६ | १४ |
| **महिला** | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | ३ | ३ | ६ |
| **खेळाडू** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **अपंग** | एकूण पद १ - श्रवणशक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | | | |
| **(२) सहायक अभियंता, गट-ब, श्रेणी-२ (एकूण पदे-२१९)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | ७ | १५+२२* | ७ | ५+१०* | ८+१२* | २ | -- | ५+६* | ९९ | १२० | २१९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | ५ | २४ | ५ | ९ | १३ | २ | -- | ८ | ६६ | ७८ | १४४ |
| **महिला** | २ | ११ | २ | ५ | ६ | -- | -- | ३ | २९ | ३६ | ६५ |
| **खेळाडू** | -- | २ | -- | १ | १ | -- | -- | -- | ४ | ६ | १० |
| **अपंग** | एकूण पदे - ६ (१) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - ३ पदे (२) श्रवणशक्तीतील दोष -३ पदे | | | | | | | | | | |
| **(ब) जलसंपदा विभाग** | | | | | | | | | | | |
| **सहायक अभियंता, गट-ब, श्रेणी-२ (एकूण पदे-१२६)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | ३४* | ८८* | २* | २* | -- | -- | -- | -- | १२६* | -- | १२६* |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | २२ | ५८ | १ | १ | -- | -- | -- | -- | ८२ | -- | ८२ |
| **महिला** | १० | २६ | १ | १ | -- | -- | -- | -- | ३८ | -- | ३८ |
| **खेळाडू** | २ | ४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ६ | -- | ६ |
| *** अनुशेषाची पदे.** | | | | | | | | | | | |

**३.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. तसेच शासनाच्या संबंधित विभागांकडून मागणीपत्र प्राप्त झाल्यास त्याचा समावेश होण्याची शक्यता आहे. संबंधित विभागाकडून मागणीपत्र प्राप्त झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत करण्यात येईल, अथवा मुलाखतीपूर्वी याबाबतची माहिती उमेदवारांना देण्यात येईल.

**३.२** महिला व खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.३** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३.४** खेळाडूंसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदांच्या मुलाखतीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**३.५** विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.६** विकलांग उमेदवारासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**३.७** विकलांग उमेदवाराची आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे; याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

**३.८** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३.९** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भा कोणतीही सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**३.१०** विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत यासंदर्भात संबंधीत उमेदवारांने आयोगास स्वतंत्रपणे पत्राद्वारे विनंती करणे आवश्यक आहे.

**३.११** प्रस्तुत भरतीकरीता महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० लागू राहील.

**४. वेतनश्रेणी :-**

**४.१** गट -अ च्या पदांकरिता रूपये १५,६००-३९,१००, (ग्रेड पे-५,४००) अधिक नियमानुसार भत्ते.

**४.२** गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८००, (ग्रेड पे-४,४००) अधिक नियमानुसार भत्ते.

**५. पात्रता :-**

**५.१** भारतीय नागरिकत्व.

**५.२ वयोमर्यादा :-**

**५.२.१** **दिनांक १ डिसेंबर, २०१५** रोजी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**५.२.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(२) पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(३) माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यत.

(४) विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५.३ शैक्षणिक अर्हता :-**

**५.३.१** सांविधानिक विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**५.३.२ प्रस्तुत भरतीकरीता खालील शैक्षणिक अर्हता शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत :-**

| अ.क्र. | संदर्भ | अर्हता |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांकः डीसीएस -१०८९/२१४८/का. सेवा -३, दिनांक २५ एप्रिल, १९९० | बी.ई. (कन्स्ट्रक्शन इंजिनिअरींग)<br>बी.ई. (सिव्हील कन्स्ट्रक्शन )<br>बी.ई. (कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी सिव्हील) |
| २ | शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक जीटीआय-१०९८/१४५७९/(२३०/९८) ता.शि २, दि.१५ मार्च, १९९९ | बी.ई. (सिव्हील वॉटर मॅनेजमेंट ) |
| ३ | शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक न्यायप्र-१००५/(३०/०५) तांशि-२, दि.१८ जुलै, २००५ | बी.ई. (स्ट्रक्चरल) |

**५.३.३** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील, परंतु महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१५ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१५ करिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.४** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**५.४.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**५.४.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.४.३** संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

**६. परीक्षेचे टप्पे - तीन**

**६.१** प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

| | | |
|---|---|---|
| (१) पूर्व परीक्षा | - | १०० गुण |
| (२) मुख्य परीक्षा | - | ५५० गुण |
| (३) मुलाखत गुण | - | ७५ गुण |

**६.२** प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज करणा-या उमेदवारांची संख्या सुमारे पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने निश्चित केलेल्या मर्यादेच्या जवळपास असेल तर पूर्व परीक्षा न घेता सदर दिनांकास थेट मुख्य परीक्षा घेण्यात येईल. याबाबतची घोषणा अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकानंतर करण्यात येईल.

**६.३** एकच परीक्षा घेण्याचा निर्णय झाल्यास विहित शैक्षणिक अर्हता आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास धारण करणे आवश्यक राहील.

६.४ **उमेदवारांनी मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचेवेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.**

**७. शुल्क : ७.१** :- अमागास - **रु. ३६५/-** **७.२** :- मागासवर्गीय - **रु. २६५/-**

**८. अर्ज करण्याची पद्धत :-**

**८.१** प्रस्तुत परीक्षेसाठी माहिती फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**८.२** पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ ते १ सप्टेंबर, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**८.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज/माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**८.४** ऑनलाईन पध्दतीने **आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.** अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**८.५** आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**८.६** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**८.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक करावे.

(२) **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने **'माझे अप्लिकेशन'** सदरातील **'स्पर्धात्मक परीक्षा'**या लिंक वर क्लिक करावे.

(३) **'स्पर्धात्मक परीक्षा'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर **' Unpaid'** असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी **' Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

(४) **'Pay Now '** या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

(५) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

(६) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(७) चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(८) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**९. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**९.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**९.३** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१०.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच "**परीक्षा** " या विभागातील "महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा" अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**११. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१२. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०१५ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**१३.** प्रस्तुत परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१४.** परीक्षेची जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १२ ऑगस्ट, २०१५.**

**सुचिता ज. परब**
**उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**(१) आयोगाच्या कार्यालयात,परीक्षा कक्षात,परीक्षा केंद्राच्या परिसरात,तसेच,शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**